# "तेलबिया प्रक्रिया उद्योगाचे रोजगार निर्मितीतील योगदानाचा अभ्यास: विशेष संदर्भ लातूर जिल्हा (आर्थिक वर्ष २०१४ ते २०२४)”

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड**
**वाणिज्य विद्याशाखेतील पीएच. डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी**
**सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा**


संशोधक

**राजेश व्यंकट पवार**

**एम. कॉम., नेट., सेट., एम.ए.**

मार्गदर्शक

**डॉ. विनोद व्यंकटराव चिंते**

**एम. कॉम., एम. फिल., पीएच. डी.**
**सहयोगी प्राध्यापक व वाणिज्य विभागप्रमुख**
**मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय**
**औराद शहाजनी, निलंगा जि.लातूर**

**संशोधन केंद्र**
**शिवाजी महाविद्यालय, रेणापूर जि.लातूर**


**सप्टेंबर २०२३**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | विवरण | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | ३ |
| २ | विषय निवडीची कारणे | ५ |
| ३ | विषयाचे महत्त्व | ६ |
| ४ | संशोधनाची उदिष्टे | ७ |
| ५ | संशोधनाची गृहीतके | ७ |
| ६ | संशोधनाची व्याप्ती व मर्यादा | ८ |
| ७ | संशोधन पद्धती | ८ |
| | ७.१ प्राथमिक माहिती | ८ |
| | ७.२ दुय्यम माहिती | ९ |
| | ७.३ नमुना निवड | ९ |
| | ७.४ सांख्यिकीय तंत्रे | १० |
| ८ | प्रकरण रूपरेषा | १० |
| ९ | संदर्भ ग्रंथ सूची | १० |

## "तेलबिया प्रक्रिया उद्योगाचे रोजगार निर्मितीतील योगदानाचा अभ्यास: विशेष संदर्भ लातूर जिल्हा (आर्थिक वर्ष २०१४ ते २०२४)"

### १. प्रस्तावना

१७६० च्या औद्योगिक क्रांती नंतर उद्योगाचा विकासाला गती मिळाली. भारताच्या औद्योगिक विकास विचारात घेताना जमशेदजी टाटा यांचे योगदान महवताचे ठरते. भारताला स्वतंत्र प्राप्त झाल्यानंतर औद्योगिक विकासाला खरी चालना मिळाली. स्वातंत्र्यानंतर भारताने आर्थिक विकास साधण्यासाठी पंच वार्षिक योजना राबविण्यास सुरुवात केली. त्याद्वारे १९५१ ते १९५५ कालावधीसाठी कृषिवर आधारित पहिली पंचवार्षिक योजना राबविली गेली. पुढे उत्पादक रोजगार निर्मितीवर आधारित सातवी योजना १९८५ ते १९९० या काळासाठी रबिवली गेली. १९७७ च्या काँगेसेत्तर सरकारचे वाणिज्य व उद्योग मंत्री जॉर्ज फर्नांडिस यांनी जिल्हा पातळीवर उद्योग केंद्रे व तालुका पातळीवर औद्योगिक वसाहत स्थापन केले.

खऱ्या अर्थाने औद्योगिक क्रांती उदारीकरण, खाजगीकरण व जागतिककरण सुधारणेमुळे झाली. उदारीकरण खाजगीकरण व जागतिकीकरण परिणाम म्हणून संपूर्ण जग ही एक बाजारपेठ बनली. त्यामूळे उद्योगाची प्रगती, विकास साधताना दूरवरच्या बाजारपेठेत पोहोचणे शक्य व्हावे यासाठी आपले प्रतिनिधी, वितरक, एजेंट यांची नेमणूक करणे आणि टी मार्फत विक्री वाढविणे बाजारपेठेचा नेटवर्क वर व्यवसायाचे विक्री आणि नफा निश्चित होत आहे. २४ जुलै १९९१ रोजी नवीन औद्योगिक धोरण जाहीर करून त्यात सार्वजनिक उद्योग क्षेत्राची भूमिका कमी करून खाजगी उद्योग क्षेत्राला महत्त्व देण्यात आले.

देशाच्या विकासामध्ये शेती आणि उद्योग या दोन्ही क्षेत्राचे महत्त्वाचे योगदान आहे. देशाच्या विकासात शेतीवरील आधारित आणि इतर उद्योग रोजगार निर्मिती मध्ये मोठ्या प्रमाणात उद्दिष्टे पूर्ण करण्याचा प्रयत्न होत आहे. सार्वजनिक व खाजगी या दोन्हीही

उद्योगातून रोजगार निर्मिती होताना दिसून येते, म्हणजे सार्वजनिक उद्योगासोबतच खाजगी उद्योग सुद्धा रोजगार निर्मितीमध्ये महत्वाची भूमिका बजावताना दिसतात.

भारतात पिवळी क्रांती ही १९८६-१९८७ मध्ये खाद्यतेलाच्या उत्पादनाला चालना देण्यासाठी सुरू करण्यात आली. आपल्या देशात सॅम पित्रोदा यांना पिवळ्या क्रांतीचे जनक मानले जाते. अमेरिका, चीन आणि ब्राझीलनंतर भारत हा चौथा तेलबिया उत्पादक देश आहे. भुईमूग, तीळ, जवस आणि एरंडीचे जगातील सर्वात मोठे उत्पादक म्हणून भारताने गौरवाचे स्थान व्यापले आहे. भूईमुग, मोहरी, सोयाबीन, सूर्यफुल, तीळ व करडई यापासून खाद्यतेल तयार करण्यात येते. उर्वरित एरंडेल आदी तेलबियांपासून तयार होणारे तेल खाण्यासाठी वापरले जात नाही. याचा वापर औद्योगिक क्षेत्रात आणि औषधांसाठी करण्यात येतो.

महाराषट्र हा तेलबिया उत्पादनासाठी अग्रेसर राज्यांपैकी एक आहे. या राज्यात तेल बिया प्रक्रिया उद्योग मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहेत. या उद्योगासाठी लागणारा कच्चा माल आणि रोजगार, वीज बाजारपेठ वाहतूक व्यवस्था या सर्व सोई सुविधा पुरविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. मराठवाड्यातील तेल बिया प्रक्रिया उद्योग मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करताना दिसून येत आहे. त्यामूळे शेतकऱ्याच्या शेत मालाला योग्य ते किंमत मिळत असल्याने शेतकऱ्याचा विकास होत आहे. त्यासोबतच या उद्योगात प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष यंत्रे आणि मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ वापरले जात आहे. रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणत उपलब्ध होत आहेत. हे उद्योग ग्रामीण विकासाचा आधार बनला आहे.

तेलबिया हे लातूर विभागाचे प्रमुख उत्पादन आहे. लातूरमध्ये भारतातील सोयाबीनचे सर्वात मोठे व्यापारी केंद्र आहे. सहकारमंत्री केशवराव सोनवणे यांच्या कार्यकाळात लातूरला पहिली एमआयडीसी उभारण्यात आली. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हितासाठी केशवराव

सोनवणे यांनी डालडा कारखाना स्थापन केला होता जो सहकारी अटींवर स्थापन करण्यात आलेली आशियातील पहिली तेल गिरणी होती. लातूर जिल्ह्यात तेलबिया उत्पादन वाढल्यामुळे तेल बिया प्रक्रिया उद्योगाची ही वाढ झाली आहे. त्यामूळे या उद्योगाचे रोजगार निर्मिती क्षमता व संधीचे अभ्यास करणे आवश्यक आहे.

**तेलबिया प्रक्रिया उद्योग**

तेलबिया प्रक्रिया उद्योग म्हणजे असे उद्योग ज्या ठिकाणी बिया बारीक करून त्यामधून तेल काढले जाते.

**तेलबिया प्रक्रिया उद्योगामध्ये तेल काढण्याची प्रक्रिया:**

- बियाणे निवड
- पूर्व-साफसफाई आणि सजावट
- बियाणे कंडिशनिंग
- हीटिंग
- तेल काढणे
- गाळणे

**२. विषय निवडीची कारणे**

१) तेलबिया प्रक्रिया उद्योगाचे महत्त्व अभ्यासणे.

२) तेलबिया प्रक्रिया उद्योगातील रोजगार निर्मितीतील योगदान जाणून घेणे.

३) तेलबिया प्रक्रिया उद्योगातील रोजगाराच्या संधीचा शोध घेणे.

४) तेलबिया प्रक्रिया उद्योगाचे लातूर जिल्ह्याच्या विकासातील भूमिका जाणून घेणे

५) तेलबिया प्रक्रिया उद्योगातील कर्मचारी, मजूर,  मालक, शेतकरी व विपणन यांच्या मधील समस्यांचा अभ्यास करणे.

६) तेलबिया प्रक्रिया उद्योगातील रोजगार विषयक समस्यांचा अभ्यास करणे.

७) राज्य व केंद्र सरकारकडून तेलबिया  उद्योगासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा अभ्यास करणे.

वरील कारणाचा अभ्यास करण्याच्या उद्देशाने संशोधनासाठी प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.

**३) विषयाचे महत्त्व**

गेल्या काही वर्षामध्ये खाद्यतेलाच्या वापराचे प्रमाण वाढलेले आहे. भारतामध्ये प्रतीव्यक्ती प्रतीवर्षी साधारणपणे १६ ते १८ किलोग्रॅम खाद्यतेल वापरले जाते. वाढत्या लोकसंख्येमुळे खाद्यतेलाची आवश्यकता वाढत जाणार आहे. देशांतर्गत तेलबिया पिकांच्या उत्पादनातून आवश्यक खाद्यतेलाची गरज पूर्ण होत नसल्यामुळे इंडोनेशिया आणि मलेशियाकडून केंद्र सरकार पाम तेलाची आयात करते. भारताला खाद्यतेल व इतर तेलाच्या बाबतीत स्वयंपूर्ण व्हायचे असेल तर तेलबिया प्रक्रिया उद्योगाचा विकास होणे गरजेचे आहे त्या सोबतच या उद्योगाचे रोजगार निर्मितीत भूमिका काय आहे याचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

१) या उद्योगातील रोजगार निर्मिती, क्षमता व संधीचे महत्व अभ्यासण्यासाठी.

२) तेलबिया या शेतमालाचे प्रक्रिया उद्योगातील महत्व समजून घेण्यासाठी.

३) खाद्यतेल मागणी, पुरवठा व विपणानाचा अभ्यास करण्यासाठी.

४) तेलबिया प्रक्रिया उद्योग विकास करण्यासाठी.

५) उद्योगांचा विस्तार करण्यासाठी.

## ४) संशोधनाची उद्दिष्टे

१) तेलबिया प्रक्रिया उद्योगाचे रोजगार निर्मितीतील भूमिका अभ्यासणे.

२) तेलबिया प्रक्रिया उद्योगाचा विकास व बाजारपेठेचा अभ्यास करणे.

३) तेलबिया या शेतमालाच्या उपलब्धतेचा अभ्यास करणे.

४) उद्योग स्थापनेतील शासनाच्या मदतीचा अभ्यास करणे.

५) तेलबिया प्रक्रिया उद्योगाची स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

## ५) संशोधनाची गृहितके

१) तेलबिया प्रक्रिया उद्योगातून रोजगाराच्या संधी निर्माण होतात.

२) बाजारपेठेचा विकास होतो.

३) तेलबिया या शेतमालाला वाजवी भाव मिळतो.

४) आर्थिक विकासाला गती मिळते.

६) **संशोधनाची व्याप्ती व मर्यादा**

**१)** सदरील विषयाच्या अभ्यासात फक्त लातूर जिल्ह्यातील तेलबिया प्रक्रिया उद्योगाचा समावेश राहील.

**२)** आर्थिक अडचण, मनुष्यबळ कमतरता, वेळेचा अभाव या सर्वांचा विचार करून संशोधन कार्य हे फक्त तेलबिया प्रक्रिया उद्योगाची रोजगार निर्मितीतील योगदान येवढ्या पुरताच मर्यादित ठेवला आहे.

**३)** अभ्यासांती येणारे निष्कर्ष हे फक्त त्या त्या तेलबिया प्रकिया उद्योगा संबंधित असतील सर्वच तेलबिया प्रक्रिया उद्योगांना लागू पडतीलच असे नाही.

**४)** प्रस्तुत संशोधन कार्य हे २०१४ ते २०२४ या कालावधीसाठी मर्यादित राहील.

**५)** प्रस्तुत संशोधन प्रामुख्याने प्राथमिक व दुय्यम सामग्री वर आधारित राहील,

७) **संशोधन पद्धती**

सदरील अभ्यास हा लातूर जिल्ह्यातील तेलबिया प्रक्रिया उद्योगा पुरताच मर्यादित आहे. तेलबिया प्रक्रिया उद्योगतील रोजगार निर्मिती क्षमतेचा अभ्यास करण्यासाठीचा कालावधी २०१४ ते २०२४ आहे. प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी प्रामुख्याने प्राथमिक सामग्रीचा व दुय्यम सामग्रीचा वापर केला जाईल.

**७.१) प्राथमिक माहिती**

सदरील विषया करिता प्राथमिक माहिती मिळवण्यासाठी उद्योगांना भेट देऊन मुलाखत, प्रश्नावली, निरीक्षण या पद्धतीचा वापर केला जाईल.

**७.२) दुय्यम माहिती**

दुय्यम माहितीचे संकलन मासिके, पुस्तके, उद्योगाचे अहवाल, शासकीय अहवाल, शासकीय रेकॉर्ड, वर्तमानपत्रे, संशोधन लेख, आयोग, परिषदा व समितीचे अहवाल, इंटरनेट इत्यादी माध्यमातून केले जाईल.

**७.३) नमुना निवड**

तेलबिया प्रक्रिया उद्योगाची रोजगार निर्मितीतील भूमिका अभ्यासासाठी लातूर जिल्ह्यातील १० तालुके यातील ६० तेलबिया प्रक्रिया उद्योगाचा नमुना म्हणून निवड केला आहे. लातूर जिल्ह्यातील तेलबिया प्रक्रिया उद्योगाचा रोजगार निर्मितीतील अभ्यास करताना नमुना निवड ही लातूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील लातूर, रेणापूर निलंगा, चाकूर, औसा, उदगीर, अहमदपूर, जळकोट, देवणी, शिरुर अनंतपाळ या तालुक्यातून नमुना निवडीसाठी तेलबिया प्रक्रिया उद्योगाची निवड केली जाईल.

**तक्ता क्र. १**

| **अ.क्र.** | **तालुके** | **तेलबिया प्रक्रिया उद्योग** |
|---|---|---|
| १ | लातूर | १५ |
| २ | उदगीर | १० |
| ३ | निलंगा | ०७ |
| ४ | अहमदपूर | ०७ |
| ५ | औसा | ०५ |
| ६ | रेनापूर | ०४ |
| ७ | चाकूर | ०३ |
| ८ | देवणी | ०३ |
| ९ | जळकोट | ०३ |
| १० | शि. अनंतपाळ | ०३ |
| **एकूण** | | **६०** |

### ७.४) सांख्यिकीय तंत्रे

प्राथमिक व दुय्यम पद्धतीने गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण करून विविध प्रकारच्या सांख्यिकीय तंत्रामध्ये केंद्रीय प्रवृत्तीचे परिमापे, प्रमाण विचलन, सहसंबंध गुणांक, कोष्टके, आलेख, टी-चाचणी, एफ-चाचणी इत्यादि तंत्राचा गरजेनुसार वापर केला जाईल.

### ८) प्रकरण रूपरेषा

प्रकरण पाहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा अभ्यास

प्रकरण तिसरे : तेलबिया प्रक्रिया उद्योगाची भूमिका

प्रकरण चौथे : तेलबिया प्रक्रिया उद्योग समोरील समस्या व उपाय

प्रकरण पाचवे : निष्कर्ष आणि शिफारशी

प्रकरण सहावे : संदर्भसूची

### ९) संदर्भ ग्रंथ सूची

१) पि.वि.शेनोय- तेलबियांचे उत्पादन, प्रक्रिया आणि व्यापार: एक धोरण आराखडा, 2003.

२) Brief Industrial Profile of Latur District, Br.MSME-Development Institute, Aurangabad (Ministry of MSME, Govt. of India).

३) B. Shukla, P. Shrivastava, & R. Gupta, Oilseed Processing Technology, Central Institute Of Agricultural Engineering, Bhopal 1992.

४) Economic Survey of Maharashtra २०२२-२३ Govt. of Maharashtra.

५) S.S. Mulik, S.S. More and R.D. Shelke, Performance of Oilseed Crops in Marathwada Region of Maharashtra State, 2018.

६) Suresh Persaud and Maurice R. Landes, The Role of Policy andIndustry Structure in India's Oilseed Markets 2017.

७) B. S. Mistri, Impact Of Grape Farming On Employment Generartion And Sustainable Development Of Agriculturists With Special Reference To The Grape Farmers In Nashik District, 2021

८) Y. M. Dixit, Nashik Jilhyatil Vividh Dharmik Sthalanmule Nirmit Rojgar Sandhiche Chikitsak Adhyayan Kalkhand 2003-2012, 2017

९) पीएम.एफ.एम.ई योजने अंतर्गत तेलबिया वाचन पुबततका, राष्ट्रीय अन्न तंत्रज्ञान संस्था उद्योजकता आणि व्यवस्थापन अन्न प्रणिया उद्योग मंत्रालय,

**Websites**

१)www.niftem.ac.in

२) www.esakal.com/amp/agro/agro-news-oil-seed-process-business-chance-72859

३) http://ecoursesonline.iasri.res.in/mod/page/view.php?id=805

४) www.mr.vikaspedia.in/agriculture/policies-and schemes/

५) https://mahades.maharashtra.gov.in/publications.do?pubId=ESM

६) www.dcmsme.govt.in

संशोधक

**राजेश व्यंकट पवार**

एम. कॉम., नेट., सेट., एम.ए.

मार्गदर्शक

**डॉ. विनोद व्यंकटराव चिंते**

एम. कॉम., एम. फिल., पीएच. डी.

सहयोगी प्राध्यापक व वाणिज्य विभागप्रमुख

मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय

औराद शहाजनी, निलंगा जि.लातूर